Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

# अध्यापन शास्त्रातील नविन प्रवाह

**श्री.संदिप रामनाथ कोते,**
**छात्राध्यापक (एम.फिल),**
**ॲड.विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविदयालय, नाशिक.**

तंत्रज्ञानाची जशीजशी प्रगती झाली तशतशी पारंपारिक अध्ययन अध्यापन प्रक्रिया त्याने प्रभावित केली. परिणामस्वरुप कधी तंत्रज्ञानाचा साधन म्हणून तर कधी त्याच्या सहाय्याने अध्यापनात नवनविन संकल्पनांचा समावेश करण्यात आला. पारपांरिक अध्यापनाचे दोष कमी करण्याच्या दृष्टीने तसेच नाविन्यता, सर्जनशीलता, उपक्रमशिलता, कृतीयुक्त किंवा सहभागी अध्यापन यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेण्यात आली.स्थळकाळाच्या अडचणींवरसुध्दा तंत्रज्ञान उपचुक्त ठरु लागले विविध प्रयोगशील व्यक्तींच्या प्रयोगातून अध्यापनशास्त्रात अलिकडे अनेक नविन प्रवाह आले आहेत.

## १) संमीश्र अध्ययन

विविध आशयाचे मिश्रण करुन अभ्यासक्रम तयार केलेला असतो.विविध आशयाचे व पध्दतींचे मिश्रण आपणास पहावयास मिळते. सर्वच प्रकारचा अभ्यासक्रम या पध्दतीत येतो म्हणूनच त्याला संमीश्र पध्दती म्हणतात. विदयार्थ्यांना विविध विषयांचे ज्ञान या पध्दतीमध्ये होते त्यामुळे विदयार्थ्यांची आकलन क्षमता आणि व्यापक दृष्टीकोनात वाढ होते. विदयार्थ्यांना फक्त एकच घटक , आशय, पध्दती शिकण्यास कंटाळवाणे वाटत असते. परंतु संमीश्र पध्दतीमध्ये संपूर्ण आशयाचे पध्दतीने ज्ञान मिळत असल्यामुळे घटकातील एकसंघपणा दूर होतो.

शिक्षणाचा प्रवास बघता पारंपारिक अध्ययन अध्यापन प्रक्रियेत शिक्षक व विदयार्थी समोरासमोर बसलेले असतात माहिती तंत्रज्ञानाचा उदय झाल्यानंतर पारंपारिक अध्ययन अध्यापन प्रक्रियेबरोबरच तंत्रज्ञानाचा विशेषतः संगणकाचा व अलिकडे इंटरनेटींचा मोठया प्रमाणावर वापर होताना दिसतो आहे. या दोन्ही प्रकारांचे अर्थपुणर्ध् व नियोजनपुर्वक एकत्रिकरण केल्यास दोघांचे फायदे मिळविता येणे शक्य आहे.या विचारातून संमीश्र अध्ययन ही संकल्पना पुढे आलेली आहे.

**समीश्र अध्ययन दृष्टीकोन**

संमीश्र अध्ययनासाठी अध्यापनात पारंपारिक पध्दतीला जोडून ऑन लाईन अध्यापन पध्दतीचा अध्ययन पूरक वातावरण निर्मितीसाठी वापर करणे आवश्यक आहे. तसे या दोन्ही पध्दती नियोजनबध्दरितीने एकत्र करणे अपेक्षित आहे. म्हणजेच ऑनलाईन पध्दती फक्त पूरक म्हणून न वापरता ती पारंपारीक अध्ययन प्रक्रियेत एकजीव होणे अपेक्षित आहे. ऑनलाईन अध्यापनाच्या एकापेक्षा जास्त प्रकारांचा वापर करुन जास्तीत जास्त अध्ययन अनुभव देऊन विदयार्थ्यांच्या आंतरिक क्रियावाढीमुळे तसच त्याला सतत कृतीशिल ठेवणे अपेक्षित आहे .

यापुर्वी शिक्षक वर्गाध्यापनाबरोबरच कार्यपुस्तीका , स्वाध्याय , चाचणी यांचा वापर अध्ययन अनुभव वाढविण्यासाठी करीत होता. त्याऐवजी आता नवनवीन सोशल नेटवर्कींगच्या ॲप्लीकेशनच्या समावेश करण्यावर संमीश्रअध्ययनावर भर दिलेला आहे. त्यात प्रामुख्याने व्हिडीओ कॉन्फरन्स , चॅटरुम, न्युज फोरम, ई-मेल, व्हॉटस अप, फेसबुक , ब्लॉग मोबाईल इत्यादीचा विचार करणे अपेक्षित आहे.

**समीश्र अध्यापनाचे फायदे**

०१ समीश्र अध्ययनामुळे विविध घटकात एकता शिकण्यास मिळते.

०२ घटकातील एकसंधपणा दूर होवू अध्ययनास विविधता मिळते

०३ विदयार्थ्यांच्या अभिरुचीप्रमाणे अध्ययन होते

०४ आशयात वेगळेपणा असल्याने अध्ययन व अध्यापन आनंददायी होते

०५ अध्यापनाच्या नविन संधी उपलब्ध होतात

०६ विदयार्थ्यांमध्ये तंत्रज्ञान वापराचे कौशल्य विकसित होते.

०७ विदयार्थ्यांच्या संप्रेशन कौशल्यात वाढ होते.

०८ अभ्यासक्रमाची पूर्तता परिणामकारकपणे होते.

०९ शिक्षकांना विविध उदाहरणासह घटका चे अध्यापन करता येते.

१० ज्ञानरचनावादास पूरक अशी ही पध्दती आहे.

**२) प्लिप वर्ग**

प्लिप वर्ग हे एक अध्यापन शास्त्रीय प्रतिमान आहे. यामध्ये विदयार्थ्यांकडुन वर्गात शिकण्यापुर्वी

घरी चित्रफितीद्वारे व्याख्यान ऐकुन, पाहुन वर्गात गृहपाठ करणे अपेक्षित असते. त्यामुळे वर्गातील वेळ हा प्रकल्प, चर्चा स्वाध्याय इत्यादी गोष्टींसाठी उपयोगात आणता येतो.

**प्लिप वर्ग दृष्टीकोन**

प्लिप व्याख्याने अनुदेशकाद्वारे बनविले जातात किंवा ऑनलाईन पोस्ट पासुन निवडले जातात. पुर्व रेकॉर्ड व्याख्यान काही पॉडकॉस्ट किंवा इतर ऑडिओ स्वरुपात असु शकतात ते वापरण्यासाठी सोईस्कर आणि एक सर्वव्यापी मॉडेल म्हणुन ओळखले जाते.प्लिप वर्ग समाजाचा एक सक्रिय ज्ञानार्जनाचा भाग म्हणुन उपयुक्त ठरते.

प्लिप वर्गात वेळेचे उपयोजन कार्यशाळेप्रमाणे होते. जेथे विदयार्थी व्याख्यानाच्या आशयाबाबत चौकशी करु शकतात. त्यांच्या ज्ञानाच्या उपयोजनासाठी त्यांच्या कौशल्यांची चाचणी करतात. आणि वर्ग अध्ययनाच्या कालावधीमध्ये कारक कौशल्यांच्या कार्यामध्ये एकमेकांशी संवाद साधतात. यात प्रशिक्षकाचे कार्य हे मार्गदर्शकाचे असते.

**कार्यपध्दती**

१ प्लिप वर्गासाठी एकच असे निश्चित मॉडेल नाही. वर्ग रचनेनुसार ते बदलते.

२ प्लिप वर्ग शालेय अभ्यासासाठी पूर्वध्वनीमुद्रीत व्याख्याने पुरवितात.

३ एका सामान्य मॉडेलमध्ये विदयार्थी पाच ते सात मिनीटांची अनेक व्याख्याने पाहू शकतात.

४ विदयार्थ्यांसाठी ऑनलाईन परिक्षा किंवा कृतीचे आयोजन केले जाते.

५ व्याख्यानांच्या पुनरावृत्तीमूळे विदयार्थ्यांच्या मनातील गोंधळ दूर केला जाते.

**प्लिप वर्गाचे फायदे**

०१ पारंपारिक अध्यापनात विदयार्थी अनेकदा जे सांगतात तेच ऐकण्याचा प्रयत्न करतात. ते प्रशिक्षकांना थांबवू शकत नाहीत

०२ न समजणाऱ्या गोष्टींचे आकलन करणे कठिण जाते. याउलट व्हिडीओ व पूर्व रेकॉर्ड केलेल्या माहितीचा वापर करुन विदयार्थी अकालनासाठी उजळणी करु शकतात.

०३ कर्णदोष असणाऱ्या विदयार्थ्यांसाठी विशेष मथळे पुरविले जातात.

०४ ज्यांची प्रथम भाषा इंग्रजी नाही अशा विदयार्थ्यांसाठी उपयुक्त

०५ समस्यांच्या आकलनासाठी वर्गातील वेळ वापरण्याची संधी अनुदेशकांना मिळते.

**३ .अध्यापनातील समाजाचा सहभाग**

अध्यापनाचा अंतीम हेतू सुविदय , सुजाण व सुसंस्कृत नागरिक घडविणे आहे सध्याचे शिक्षण हे व्यवहारापासून फार दूर असल्याने शालेय जीवनानंतर विदयार्थी समर्थपणे समाज जीवनाची वाटचाल करु शकत नाही. त्यामुळे समाजातील तज्ज्ञ व्यक्तींचा सहभाग उपयुक्त ठरेल. समाजाचा सहभाग दोन प्रकारे घेता येईल

०१ अ) शाळेतील विदयार्थी समाजाकडे जावुन शिक्षण घेतात

आ) समाजातील घटक वा सामाजिक संस्थांचे काही प्रतिनिधी शाळेत येवुन आपल्या अध्यापन कौशल्याचा लाभ शालेय विदयार्थी विदयार्थीनींना करुन देतात.

०२ अ) समाजाचा शालेय विषयांच्या अध्यापनात सहभाग उदा विदयार्थ्यांना व्यवसाय केंद्रावर (शेत, कारखाना, कार्यालय) नेवुन सप्रयोग प्रात्यक्षिकांसह अध्यापन करणे

आ) पुरक विषयांच्या अध्यापनातील सहभाग उदा विविध क्रीडा, कला व छंद यांचे मार्गदर्शन वर्ग आयोजित करणे


इ) नैतिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये रुजविण्यासाठी प्रयत्नात सहीााग उदा श्रमदान, रक्तदान, अंध्यश्रध्दा निर्मुलन, प्रथमोपचार, रुग्णसेवा आदीसाठी शिबीरे वा कार्यक्रम आयोजित करणे

ई) काही संस्था वा व्यक्ती अप्रत्यक्ष रितीने अध्यापनात सहभागी होतात उदा. वहया पुस्तके उपलब्ध करुन देणे, गणवेश देणे

उ) शिक्षक पालक संघाचे सहकार्य घेणे

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

**४.अध्यापनात नविन तंत्रज्ञानाचा वापर**





या तंत्रज्ञानाच्या वापराबरोबरच सांघिक अध्यापनाचा वापर करुन अध्यापन आनंददायी व परिणामकारक होवू शकते.

पारंपारिक अध्ययन हे १ श्रवण व २ पाठांतर यावर आधारित असल्याने पुढील दोष निर्माण होतात.

१) केवळ स्मरणावर आधारित अध्ययन असल्याने विदयार्थांना कंटाळा येतो

२) पाठांतर न झालेने शिक्षा होण्याच्या भितीने विदयार्थी शाळा सोडून देतात.

पारंपारिक अध्ययनातील दोष दूर होण्यासाठी अध्ययनात पुढील नवीन तंत्रज्ञानाचा वापर करता येईल.



वरील सर्व बाबींचा विचार करता थोडक्यात असे म्हणता येईल की, शिक्षणाचा प्रवास बघता पारंपारिक अध्ययन अध्यापन प्रक्रियेत शिक्षक व विदयार्थी समोरासमोर बसलेले असतात. माहिती व तंत्रज्ञानाचा उदय झाल्यावर पारंपारिक अध्ययन अध्यापनाला छेद देवुन तंत्रज्ञानाचा विशेषतः संगणकाचा व अलिकडे इंटरनेटचा मोइया प्रमाणावर वापर होतांना दिसतोय. या प्रकाराचा नियोजनपुर्वक उपयोग केल्यास अध्यापक व अध्ययनार्थी या दोघाचही प्रचंड फायदा होवून अध्ययन अध्यापनाला एक वेगळी उंची मिळाल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची**

०१ प्रा.दयानंद व प्रा.शिंदे के.डी. : शैक्षणिक व्यवस्थापन, श्री प्रकाशन पुणे

०२ प्रा.दयानंद व प्रा.शिंदे के.डी. : माहिती संप्रेषण तंत्रज्ञान, श्री प्रकाशन पुणे

०३ प्रा.नाममोती व प्रा.देसले सुनिल : प्रगत अध्यापनशास्त्र , सात्विक प्रकाशन नाशिक